पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

**मा.स्थायी समिती विशेष सभा**

कार्यपत्रिका क्रमांक – ५२

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक – **०७/०३/२०१८** वेळ – दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची विशेष सभा **बुधवार** दिनांक **०७/०३/२०१८** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात **मा.सुशील खोडवेकर (भा.प्र.से.) पिठासीन प्राधिकारी तथा प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे** यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.उंडे लक्ष्मण धोंडू
२. मा.उत्तम प्रकाश केंदळे
३. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
४. मा.कुटे निर्मला संजय
५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
६. मा.राजू मिसाळ
७. मा.अमित राजेंद्र गावडे
८. मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे
९. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
१०. मा.आंगोळकर सागर सुनिल
११. मा.ममता विनायक गायकवाड
१२. मा.राहुल गुलाब जाधव
१३. मा.लोंढे नम्रता योगेश
१४. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
१५. मा.गीता सुशिल मंचरकर
१६. मा.खानोलकर प्रज्ञा महेश

याशिवाय मा.प्रविण अष्टिकर-प्र.अतिरिक्त आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.बोदडे-सहा.आयुक्त हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.पिठासीन प्राधिकारी-** सन्मा.सदस्य, मा.आयुक्त, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो.
**तथा प्रकल्प संचालक** आजच्या विशेष सभेत स्थायी समितीचे सभापती पदावर नेमणूक
**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी** करणेचा विषय आहे. त्यासाठी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांनी सभेचा
**विकास प्रकल्प** पिठासीन प्राधिकारी म्हणुन आदेश क्रमांक:नपाप्र/१/कावि/१२१/२०१८ दिनांक- १ मार्च २०१८ या आदेशान्वये त्यांचा प्रतिनिधी म्हणून विशेष स्थायी समिती सभेचा पिठासीन प्राधिकारी म्हणून **मा.सुशील खोडवेकर (भा.प्र.से.) प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे** यांना म्हणजे मला या ठिकाणी नियुक्त केलेले आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.स्थायी समितीच्या सभापती पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामाकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देतो.

**(मा.सभापती, स्थायी समिती यांची निवड करण्यासाठी कार्यपध्दतीची माहिती देण्यात आली.)**

**मा.नगरसचिव -** मा.स्थायी समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१ (१) नुसार नेमणुक करणे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१ (१) नुसार स्थायी समिती सभापती पदाची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल. मा.विभागीय आयुक्त यांचेकडील आदेश क्र.नपाप्र/१/कावि/१२१/२०१८, दि.१ मार्च २०१८ अन्वये मा.सभापती, स्थायी समिती यांची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त, पुणे यांचे प्रतिनिधी म्हणून **मा.सुशील खोडवेकर (भा.प्र.से.) प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, पुणे** यांची नेमणुक करणेत आलेली आहे.

मुदतीत दोन उमेदवारांनी एकूण ०५ (पाच) नामनिर्देशनपत्रे दाखल केली असून नामनिर्देशनपत्रे छाननी करिता मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.
(मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेली ०५ नामनिर्देशनपत्रे मा.पिठासीन प्राधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली. मा.पिठासीन प्राधिकारी यांनी त्यांची छाननी केली.)

**मा.पिठासीन प्राधिकारी - तथा प्रकल्प संचालक महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, स्थायी समिती पदाकरीता दोन उमेदवारांची एकूण ०५ (पाच) नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामध्ये उमेदवार व त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १) | **मा.ममता विनायक गायकवाड** | मा.मडिगेरी विलास हनुमंतराव | मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे |
| २) | **मा.ममता विनायक गायकवाड** | मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे | मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई |
| ३) | **मा.ममता विनायक गायकवाड** | मा.आंगोळकर सागर सुनिल | मा.कुटे निर्मला संजय |
| ४) | **मा.भोंडवे मोरेश्वर महादू** | मा.मंचरकर गीता सुशिल | मा.खानोलकर प्रज्ञा महेश |
| ५) | **मा.भोंडवे मोरेश्वर महादू** | मा.मंचरकर गीता सुशिल | मा.खानोलकर प्रज्ञा महेश |

**मा.पिठासीन प्राधिकारी- तथा प्रकल्प संचालक महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प** मा.सभापती, स्थायी समितीचे पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एकूण ५ (पाच) नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आली असून मा.ममता विनायक गायकवाड यांनी ०३ नामनिर्देशनपत्रे सादर केली असून त्यावर उमेदवार यांची स्वाक्षरी आहे. तसेच अनुमोदक-सुचक वेगवेगळे स्थायी समिती सदस्य असून त्यांची स्वाक्षरी असल्याने ती वैध ठरलेली आहेत आणि मा.मोरेश्वर महादू भोंडवे यांनी दोन नामनिर्देशन पत्रे सादर केली असून त्यांचे अ.क्र.४ चे पहिले नामनिर्देशन पत्रावर उमेदवार आणि अनुमोदक व सुचक यांची स्वाक्षरी असल्याने त्यांचे पहिले नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात येत आहे.

तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ मधील नियम क्रमांक-३ (३) आणि नियम क्रमांक ५ (२) मधील तरतूदीनुसार त्यांचे पहिले नामनिर्देशन पत्र वैध ठरल्याने आणि त्यांचे दुसरे अक्र.५ चे नामनिर्देशन पत्रावरील स्वाक्षरी करणारे अनुमोदक व सुचक त्यांचे पहिल्या नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करणारेच स्थायी समिती सदस्य असल्याने सदर त्यांचे दुसरे नामनिर्देशन पत्र अवैध ठरविण्यात येत आहे.

सबब,स्थायी समिती पदाकरिता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

१) मा.ममता विनायक गायकवाड
२) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

कोणत्याही उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस पिठासीन प्राधिकारी यांजकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल.

[मा.पिठासीन प्राधिकारी यांनी उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेला **दुपारी १२.२५** ते **दुपारी १२.४०** हा १५ मिनिटांचा अवधी संपला.]

| | |
|---|---|
| **मा.पिठासीन प्राधिकारी - तथा प्रकल्प संचालक महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प** | उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेली १५ मिनिटांच्या वेळेमध्ये कोणाही उमेदवाराने उमेदवारी मागे घेतलेली नाही. सबब, मा.नगरसचिव यांना निवडणूक प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश देत आहे. |

(मा.नगरसचिव यांनी निवडणूक प्रक्रियेबाबत माहिती दिली.)

| | |
|---|---|
| **मा.पिठासीन प्राधिकारी - तथा प्रकल्प संचालक महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प** | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, स्थायी समिती पदाकरीता निवडणूक लढविणारे दोन वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. त्यांची इंग्रजी वर्णानुक्रमे नावे खालील प्रमाणे आहेत. |

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १) | ममता विनायक गायकवाड |
| २) | मोरेश्वर महादू भोंडवे |

मा.पिठासीन प्राधिकारी तथा प्रकल्प संचालक यांनी वर्णानुक्रमे प्रथम उमेदवार मा.ममता विनायक गायकवाड यांचे नाव घोषित केले व ज्यांनी हात वर करुन त्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले अशा मा.स्थायी समिती सदस्यांच्या नावाची नोंद घेतली.

अशा मा.स्थायी समिती सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | स्थायी समिती सदस्याचे नाव |
|---|---|
| १) | मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई |
| २) | मा.मडिगेरी विलास हनुमंतराव |
| ३) | मा.ममता विनायक गायकवाड |
| ४) | मा.कुटे निर्मला संजय |
| ५) | मा.लोंढे नम्रता योगेश |
| ६) | मा.उत्तम प्रकाश केंदळे |
| ७) | मा.आंगोळकर सागर सुनिल |
| ८) | मा.उंडे लक्ष्मण धोंडू |

| | |
|---|---|
| ९) | मा.राहुल गुलाब जाधव |
| १०) | मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे |
| ११) | मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे |

त्यानंतर मा.पिठासीन प्राधिकारी तथा प्रकल्प संचालक यांनी वर्णानुक्रमे द्वितीय उमेदवार मा.मोरेश्वर महादू भोंडवे यांचे नाव घोषित केले. व ज्यांनी हात वर करुन त्या उमेदवाराच्या बाजूने मत दिले अशा मा.स्थायी समिती सदस्यांच्या नावांची नोंद घेतली.

अशा मा.स्थायी समिती सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | स्थायी समिती सदस्याचे नाव |
|---|---|
| १) | मा.राजू मिसाळ |
| २) | मा.मोरेश्वर महादू भोंडवे |
| ३) | मा.खानोलकर प्रज्ञा महेश |
| ४) | मा.गीता सुशिल मंचरकर |

त्यानंतर मा.पिठासीन प्राधिकारी यांनी ज्या सदस्यांनी मतदान केलेले नाही, अशा मा.स्थायी समिती सदस्यांच्या नावाची नोंद घेतली.

अशा मा.स्थायी समिती सदस्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | स्थायी समिती सदस्याचे नाव |
|---|---|
| १) | मा.अमित राजेंद्र गावडे |

**मा.पिठासीन प्राधिकारी - तथा प्रकल्प संचालक महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प** मा.सभापती, स्थायी समिती पदाकरीता हात वर करुन मतदान घेण्यात आले. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे -

i) एकूण स्थायी समिती सदस्यांची संख्या - **१६**

ii) मतदान केलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या - **१५**

iii) मतदान न केलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या - **०१**

iv) निवडणूक लढविणा-या प्रत्येक उमेदवारास प्राप्त झालेल्या मतांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

१) मा.ममता विनायक गायकवाड - **११** मते

२) मा.मोरेश्वर महादू भोंडवे - **०४** मते

यावरुन **मा.ममता विनायक गायकवाड** यांना सभापती, स्थायी समिती पदाकरिताच्या मतदानात सर्वात जास्त मते पडलेली असल्याने **मा.ममता विनायक गायकवाड** यांना सभापती, स्थायी समिती पदाकरिता वैधरित्या निवडून आल्याचे मी जाहीर करतो.

---------

ठराव क्रमांक -२४०४ विषय क्रमांक - १
दिनांक - ०७/०३/२०१८ विभाग - नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.सभापती,स्थायी समिती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रांमधील दोन उमेदवारांपैकी उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या १५ मिनिटांच्या अवधीत कोणीही उमेदवारी मागे घेतली नसल्याने निवडणूक लढविणारे १) मा.ममता विनायक गायकवाड, २) मा.मोरेश्वर महादू भोंडवे, हे दोन वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने नियमाप्रमाणे घेणेत आलेल्या मतदानामध्ये –

**१)** मा.ममता विनायक गायकवाड यांना **११ मते**

**२)** मा.मोरेश्वर महादू भोंडवे यांना **०४ मते**

मिळाल्याने व यावरुन **मा.ममता विनायक गायकवाड** यांना सर्वात जास्त मते पडलेली असल्याने नियमाप्रमाणे **मा.ममता विनायक गायकवाड** यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.सभापती, स्थायी समिती पदावर रितसर वैधरित्या निवडून आल्याचे जाहीर करण्यात येत आहे.

----------

(नवनिर्वाचित सभापती,मा.स्थायी समिती **मा.ममता विनायक गायकवाड** यांचे मा.पिठासीन प्राधिकारी यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.)

----------

यानंतर मा.पिठासीन प्राधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
(**सुशील खोडवेकर**,भा.प्र.से.)
**पिठासीन प्राधिकारी तथा**
**प्रकल्प संचालक,**
**महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प**
स्थायी समिती (विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/७/कावि/१३५/२०१८
दिनांक : ०७/०३/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.